| | पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक – पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | |
|---|---|---|

**प्रेस नोट** दिनांक : ०४/०३/२०२४

## मोटर सायकल चोरणारा सराईत गुन्हेगार - स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात चोरीच्या १० मोटर सायकल हस्तगत

---

नाशिक ग्रामीण जिल्हयातील मोटर सायकल चोरीचे गुन्हयांना प्रतिबंध होण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांनी नाउघड गुन्हयांचा आढावा घेवून कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याअनूषंगाने अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर यांनी नाउघड मोटर सायकल चोरीचे गुन्हयांतील आरोपींचे सध्याचे वास्तव्याबाबत माहिती घेवून स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना गुन्हे उघडकीस आणण्यासाठी सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार हे नाउघड मोटर सायकल चोरीचे गुन्हयांचा समांतर तपास करीत असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, घोटी ते सिन्नर रोडवर सिन्नर फाटा परिसरात सराईत गुन्हेगार गुरूदेव खतेले हा चोरीची पल्सर २२० मोटर सायकल घेऊन येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली. त्यानुसार स्थागुशाचे पोलीस पथकाने घोटी शहरातील सिन्नर फाटा परिसरात सापळा रचून सराईत गुन्हेगार नामे **गुरूदेव काळू खतेले, वय २६, रा. खडकेद, ता.इगतपुरी, जि.नाशिक** यास ताब्यात घेतले. त्याचे कब्जात मिळून आलेल्या बजाज २२० पल्सर मोटर सायकलचे कागदपत्रांबाबत विचारपुस केली असता, त्याने उडवा-उडवीची उत्तरे दिली. त्यास विश्वासात घेवून चौकशी केली असता त्याने सदरची मोटर सायकल ही गोंदे, ता.इगतपुरी परिसरातूल चोरी केल्याची कबुली दिली आहे.

यातील ताब्यात घेतलेला आरोपी गुरूदेव खतेले यास अधिक विश्वासात घेवून सखोल चौकशी केली असता, त्याने त्याचा साथीदार **शंकर एकनाथ गांगड**, रा. उबाडे, ता.इगतपुरी याचेसह सिन्नर, वाडीव-हे, नाशिक शहरातील अंबड, आडगाव परिसरातून एकूण **१० मोटर सायकल चोरी** केल्याची कबुली दिली असून सदर मोटर सायकलचे वर्णन खालील प्रमाणे..

| अ.क्र. | कंपनी | चेसिस / इंजिन नंबर | पोलीस स्टेशन दाखल गुन्हे |
|---|---|---|---|
| १ | बजाज पल्सर २२० | चेसिस - MD2A13EY4HCH8851<br>इंजिन - DKYCHH77786 | वाडीव-हे पो.स्टे.<br>गुरनं २६६/२०२३ भादवि ३७९ |
| २ | बजाज पल्सर २२० | चेसिस - MD2A13EX3LCL11444<br>इंजिन - DKXCLL06755 | सिन्नर पो.स्टे.<br>गुरनं १५६/२०२४ भादवि ३७९ |
| ३ | बजाज पल्सर २२० | चेसिस - MD2A13EY7GCH55203<br>इंजिन - DYKCGH72349 | आडगाव पो.स्टे. नाशिक शहर<br>गुरनं २५८/२०२३ भादवि ३७९ |
| ४ | बजाज पल्सर २२० | चेसिस - MD2A13EZ9FCG20375<br>इंजिन - DKZCFG57477 | अंबड पो.स्टे. नाशिक शहर<br>गुरनं ३००/२०२२ भादवि ३७९ |
| ५ | बजाज पल्सर २२० | चेसिस - MD2A13EY4HCF70026<br>इंजिन - DKYCHF59093 | MH-03-DH-0698 |
| ६ | होंडा शाईन | चेसिस - ME4JC651JF7210681<br>इंजिन - JC65E70311589 | MH-15-FB-7340 |
| ७ | हिरो स्प्लेंडर | चेसिस - 03G20C28272<br>इंजिन - 03G18M29033 | No Record |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | हिरो स्प्लेंडर | चेसिस - 05G15M32379<br>इंजिन - 05G16C32258 | No Record |
| ९ | होंडा ॲक्टीव्हा | चेसिस - ME4JF504HF7260405<br>इंजिन - JF50E72260453 | MH-49-AA-1613 |
| १० | हिरो स्प्लेंडर | चेसिस - खोडलेला<br>इंजिन - खोडलेला | MH-05-M-8675 |

वरील आरोपी गुरूदेव खतेले याचे कब्जातुन ***चोरीच्या १० मोटर सायकल किं.०९ लाख रू.*** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला असून, सदर आरोपीने कबुली दिल्यावरुन वाडीव-हे, सिन्नर, अंबड, आडगाव पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेले ***मोटर सायकल चोरीचे ०४ गुन्हे उघडकीस*** आलेले आहेत.

सदर आरोपी **गुरूदेव काळू खतेले** हा सराईत गुन्हेगार असून त्याचेवर यापुर्वी खुन, दरोडा तयारी, घरफोडी, चोरी तसेच मोटर सायकल चोरी असे एकुण १२ गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. बजाज २२० पल्सर मोटर सायकल चोरण्यात तो तरबेज असल्याचे समोर आले आहे, त्यास **वाडीव-हे** पोलीस ठाणेकडील **गुरनं २६६/२०२३ भादवि कलम ३७९** या गुन्हयात हजर करण्यात आले असून मोटर सायकल चोरीचे आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि श्री. राजु सुर्वे, सपोनि गणेश शिंदे, पोउनि नाना शिरोळे, सपोउनि शिवाजी ठोंबरे, पोहवा नवनाथ सानप, चेतन संवस्तरकर, प्रविण सानप, किशोर खराटे, संदिप नागपुरे, पोना विश्वनाथ काकड, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, चापोकॉ म्हसदे, पोना शिवाजी शिंदे, योगेश यंदे यांचे पथकाने मोटर सायकल चोरीचे ०४ गुन्हे उघडकीस आणुन कामगिरी केली आहे.